| | |
|---|---|
| MHKO070001572016 | **रे.क.नं.३०/२०१६**<br>दिपक अशोक कोळी आणि इतर<br>विरुध्द<br>प्रकाश बापू कोळी आणि इतर |

## निशाणी क्र.५६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी नि.क्र.५३ वरील नो से चा आदेश सेट असाईड करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जाच्या पाठीमागेच आपले म्हणणे नोंदवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी यातील वादीनी नि.क्र.५३ कडे ट्रान्सपोझचा अर्ज दाखल केला आहे. यातील प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दिले नसलेने दि.०४/१०/२०२५ रोजी No say चा आदेश झालेला आहे. सदरचा झालेला आदेश set aside होवुन म्हणणे देणेस प्रतिवादीचा हा अर्ज आहे. यातील प्रतिवादी हे दि.१२/०८/२०२५ ला अमेरीका येथे गेले होते. ते दि.२९/०१/२०२६ रोजी परत भारतात आले आहेत. त्यामुळे कामी म्हणणे देणे अडचणीचे झाले होते. या कारणाने अर्ज मंजुर होणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजुर करणेविषयी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०३. वादीने सदर अर्जाच्या पाठीमागेच आपले म्हणणे देवुन कथन केले आहे की, प्रस्तुतचा प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी जाणुनबूजुन काम लांबवण्यासाठी म्हणणे मुदतीत दिले नाही. प्रतिवादी हे अमेरीका येथे गेले असलेबाबत कोणताही पुरावा अर्जासोबत जोडलेला नाही. सबब सदरचा प्रतिवादी यांचा अर्ज cost सहीत नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे

अत्यंत न्याय व गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी अर्जात सदर उशिराबाबत कारण नमुद केलेले आहे. सदरचा उशिर हा जास्तीचा कालावधीचा असल्याचे दिसुन येत नाही. दाव्यातील प्रत्येक अर्ज हा गुणदोषावर निकाली निघणे अत्यंत आवश्यक आहे. तांत्रिक कारणास्तव अर्ज नामंजुर करणे हे योग्य होणार नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांना संधी देणे विधीसंगत वाटते. तसेच संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीला खर्च देणे देखील गरजेचे आहे. सदर वेळ ही जास्तीच्या कालावधीची नसल्याने सदर अर्जावर जास्त खर्च लावणे योग्य, न्याय व गरजेचे असल्याचे दिसून येत नाही. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५६) हा प्रतिवादी यांनी खर्च म्हणून वादी यांना र.रू.१५०/– (र.रु.एकशे पन्नास फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी विरुध्द झालेला ''विना म्हणणे'' चा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.04 17:07:11 +0530

दि.०४/०५/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 04/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 04/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 04/05/2026. |